**<u>ठळक बातम्या</u>**

- महाराष्ट्र राज्याच्या स्थापना दिनानिमित्त सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन
- महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांची भूमिका
- व्यावसायिक वापराचा एलपीजी सिलिंडर ९९३ रुपयांनी महाग, मुंबईत १९ किलो सिलिंडरची किंमत ३ हजाराच्या वर

आणि

- इराणवर पुन्हा हवाई हल्ले करण्याची शक्यता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेटाळली

**<><><><><>**

महाराष्ट्र  राज्याचा ६७वा स्थापना दिन आज साजरा होत आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन तसंच प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी राज्यातल्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. छत्रपती शिवाजी महाराजांची पवित्र भूमी देशभक्ती, साहस आणि आत्मसन्मानाची प्रेरणा देते असं राष्ट्रपतींनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे. तर महाराष्ट्र हे उच्च सांस्कृतिक परंपरा, सामाजिक सुधारणा, आणि सर्वांगीण प्रगतीचं प्रतीक असल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे. महाराष्ट्राने साहित्य, नाट्य, संगीत, चित्रपट,याप्रमाणेच उद्योग, शिक्षण, विज्ञान आणि समाजसेवेत प्रगतीचे नवे मानदंड प्रस्थापित केले असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं  आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्रात आज राज्य स्थापना दिनानिमित्त ध्वजवंदन, संचलन आणि इतर कार्यक्रम होत आहेत. मुंबईत शिवाजी पार्क मैदानावर झालेल्या मुख्य शासकीय सोहळ्यात राज्यपाल जिष्णू देव वर्मा यांच्या हस्ते ध्वजारोहण झालं. त्यानंतर राज्य पोलीस तसंच इतर पथकांच्या संचलनाची मानवंदना राज्यपालांनी स्वीकारली. भाषणाची सुरुवात मराठीत करताना ते म्हणाले…

- **- होल्ड- बाईट- राज्यपाल**

महाराष्ट्रानं विविध क्षेत्रात केलेल्या कामगिरीचा आढावा घेताना राज्यपालांनी सांगितलं, की ५ ट्रिलियन डॉलरची अर्थव्यवस्था बनण्याच्या दिशेनं महाराष्ट्राची वाटचाल सुरु आहे. परदेशी गुंतवणूक, पायाभूत सुविधा विकास, शेती, वीज, शिक्षण, गृहनिर्माण, महिला सक्षमीकरण, सामाजिक बांधिलकी इत्यादी क्षेत्रात राज्य सरकारनं केलेल्या कामगिरीचा उल्लेख राज्यपालांनी केला. आगामी सिंहस्थ कुंभ मेळ्यानिमित्त नाशिकमधे सुरु असलेल्या कामाच्या नियोजनाची त्यांनी प्रशंसा केली.

मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, विधान परिषदेचे सभापती राम शिंदे, मुंबईच्या महापौर रितू तावडे, पोलीस महासंचालक सदानंद दाते, इत्यादी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

राज्याच्या सर्व जिल्हा मुख्यालयांमधे पालक मंत्री किंवा जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते तिरंगा फडकावण्यात आला. सर्व शासकीय आणि निमशासकीय कार्यालयं, तसंच शाळा महाविद्यालयांमधेही ध्वजवंदनेचे कार्यक्रम झाले.

**<><><><><>**

स्वभाषेचा अभिमान असलाच पाहिजे, महाराष्ट्रात राहणाऱ्यांनी मराठी शिकलीच पाहिजे, मात्र मराठी न येण्यावरुन हिंसा कधीही खपवून घेतली जाणार नाही, असं मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी स्पष्ट केलं आहे. महाराष्ट्र दिनानिमित्त मुंबईत संयुक्त महाराष्ट्र लढ्यात बलिदान देणाऱ्यांच्या हुतात्मा स्मारकावर आदरांजली वाहिल्यानंतर ते बातमीदारांशी बोलत होते.

**- - - होल्ड - बाईट - मुख्यमंत्री - - -**

महाराष्ट्र संकुचित वृत्तीचा कधीच नव्हता, महाराष्ट्राच्या भक्ती संप्रदायानं, आणि सुधारणावादानं देशाला दिशा दिली असून राज्याची अर्थव्यवस्था जगात तिसाव्या क्रमांकावर असल्याचं ते म्हणाले.

राज्यातल्या जनतेला त्यांनी महाराष्ट्र राज्य स्थापना दिनाच्या तसंच जागतिक कामगार दिनानिमित्त शुभेच्छा दिल्या.

**<><><><><>**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गुजरातच्या स्थापना दिनानिमित्त गुजरातच्या जनतेला शुभेच्छा दिल्या आहेत. महात्मा गांधी, स्वामी दयानंद सरस्वती, आणि सरदार वल्लभभाई पटेल यांची पवित्र जन्मभूमी

सामाजिक उत्थान, देशभक्ती आणि राष्ट्रनिर्माणाचा प्रेरणास्रोत ठरल्याचं राष्ट्रपतींनी समाज मध्यमवर मध्ये म्हटलं आहे.

उद्यमशीलतेची भावना आणि नवोन्मेष यासाठी ओळखल्या जाणाऱ्या गुजरात राज्यानं भारताची आर्थिक ताकद आणि सांस्कृतिक समृद्धी घडवण्यात महत्त्वाची भूमिका बजावल्याचं उपराष्ट्रपतींनी म्हटलं आहे.

तर, आजचा दिवस गुजरातचा समृद्ध इतिहास, चैतन्यमय संस्कृती आणि असाधारण ऊर्जेचा उत्सव असल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी शुभेच्छा संदेशात म्हटलं आहे.

<><><><><>

राज्यपाल जिष्णु देव वर्मा यांनी केलेल्या स्व-गणेनेनं देशातल्या 'जनगणना २०२७' या पहिल्या डिजिटल जनगणनेचा राज्यातला औपचारिक प्रारंभ आज मुंबईतल्या लोकभवनात करण्यात आला.

राज्याच्या स्थापनादिनी जनगणना सुरु होत असल्याबद्दल आनंद व्यक्त करताना राज्यपालांनी राज्यातल्या जनतेला जनगणनेच्या राष्ट्रीय उपक्रमात सहभागी होण्याचं आवाहन केलं.

ही स्व-गणना येत्या १५ मे पर्यंत चालणार असून त्यानंतर जनगणना कर्मचारी घरोघरी जाणार आहेत. ही स्व-गणना प्रत्येक नागरिकाला स्वतःला करायची असून त्यामध्ये ३३ प्रश्नाची उत्तरं द्यायची आहेत. अवघ्या दहा मिनिटात स्व-गणना करता येते. राज्यातले २लाख ६० हजार कर्मचारी जनगणना करणार असल्याची माहिती महाराष्ट्राच्या प्रधान जनगणना अधिकारी डॉ. निरुपमा जे. डांगे यांनी यावेळी दिली.

राज्याच्या इतर भागात पालकमंत्र्यांनी स्वगणनेत सहभाग नोंदवून प्रक्रियेला सुरुवात केली.

<><><><><>

पेट्रोलियम कंपन्यांनी व्यावसायिक एलपीजी सिलिंडरची किंमत आजपासून तब्बल ९९३ रुपयांनी वाढवली आहे. त्यामुळे मुंबईत १९ किलो वजनाचं व्यावसायिक वापराचं सिलिंडर ३ हजार २४ रुपयांना मिळेल. एप्रिल महिन्यात या सिलिंडरची किंमत १९५ रुपये ५० पैशांनी, आणि मार्चमध्ये ११४ रुपये ५० पैशांनी वाढवली होती. घरगुती वापराच्या

एलपीजी सिलिंडरची किंमत ९१२ रुपये ५० पैशांवर कायम राहणार आहे. विमान इंधनाच्या किंमती पेट्रोलियम कंपन्यांनी ५ टक्क्यानं वाढवल्या आहेत.

केंद्र सरकारनं डिझेलच्या निर्यातीवरचा कर लिटरमागं २३ रुपयांनी घटवला आहे. तर विमान इंधनावरचा कर ३३ रुपयांनी कमी केला आहे. देशांतर्गत वापराच्या डिझेलवरच्या करांमध्ये मात्र कुठलाही बदल झालेला नाही.

सर्वसामान्य जनतेसाठी पेट्रोल, डिझेल आणि रॉकेलच्या किरकोळ दरात कोणताही बदल झाला नसल्याचं इंडियन ऑइल कोर्पोरेशन लिमिटेडनं जारी केलेल्या पत्रकात म्हटलं आहे.

<><><><><>

एप्रिल महिन्यात जीएसटी, अर्थात वस्तू आणि सेवा कराच्या एकूण संकलनात ८ पूर्णांक ७ टक्के वाढ होऊन ते सुमारे २ लाख ४३ हजार कोटी रुपयांच्या विक्रमी पातळीवर पोहोचल्याचं आज जाहीर झालेल्या सरकारी आकडेवारीत म्हटलं आहे. यापूर्वी, गेल्या वर्षीच्या एप्रिल महिन्यात जीएसटीची सर्वाधिक वसुली नोंदवली गेली होती.

<><><><><>

एनसीबी, अर्थात अंमली पदार्थ नियंत्रण विभागानं मुंबईत नुकत्याच राबवलेल्या मोहिमेत १ हजार ७४५ कोटी रुपये किमतीचं ३४९ किलो, उच्च दर्जाचं कोकेन जप्त केलं. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी आज समाज माध्यमवर ही माहिती दिली. या यशाबद्दल त्यांनी एनसीबीच्या पथकाचं अभिनंदन केलं असून, अमली पदार्थांच्या तस्करीचं जाळं उध्वस्त करण्याचा सरकारचा निर्धार असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

<><><><><>

मतदान आणि मतमोजणीमध्ये जाणिवपूर्वक चार दिवसांचं अंतर जाणीवपूर्वक ठेवलं असून, या काळात इलेट्रॉनिक मतदान यंत्रांमध्ये फेरफार करण्याचा प्रयत्न होऊ शकतो असा आरोप पश्चिम बंगालच्या मुख्यमंत्री आणि तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी केला आहे. त्यांनी काल रात्री कोलकाता इथल्या एका स्ट्रॉन्गरूमला भेट दिली, त्यानंतर त्या बातमीदारांशी बोलत होत्या.

पश्चिम बंगालचे मुख्य निवडणूक अधिकारी मनोज अग्रवाल यांनी ममता बॅनर्जी यांचे आरोप निराधार असल्याचं म्हटलं आहे.

<><><><><>

सर्वोच्च न्यायालयानं काँग्रेस नेते पवन खेरा यांना अटकपूर्व जामीन मंजूर केला आहे. आसामचे मुख्यमंत्री हिंमता बिस्वा सर्मा यांच्या पत्नीकडे एकापेक्षा अधिक पासपोर्ट असल्याचा आणि परदेशात त्यांची संपत्ती असल्याचा आरोप खेरा यांनी केला होता. याप्रकरणी तपासात सहकार्य करण्याचं आणि चौकशीसाठी पोलिस ठाण्यात हजर राहण्याचे आदेशही न्यायालयानं खेरा यांना दिले आहेत.

<><><><><>

अमेरिकेने भारताला सुमारे १४ दशलक्ष डॉलर्स किमतीच्या ६५७ प्राचीन वस्तू परत केल्या आहेत. मॅनहॅटनचे जिल्हा ॲटर्नी अल्विन ब्रॅग यांनी न्यूयॉर्कमधल्या भारताच्या महावाणिज्यदूत राजलक्ष्मी कदम यांच्या उपस्थितीत झालेल्या एका समारंभात या वस्तू भारताकडे सुपूर्द केल्याची घोषणा केली. तस्करीच्या मार्गाने या वस्तू भारताबाहेर गेल्या होत्या. या वस्तू भारताला परत मिळवून देण्यासाठी मॅनहॅटन जिल्हा ॲटर्नी कार्यालय, अमेरिकेचा  गृहसुरक्षा विभाग आणि विविध संस्थांनी केलेल्या सातत्यपूर्ण प्रयत्नांची भारताचे महावाणिज्यदूत बिनय प्रधान यांनी प्रशंसा केली आहे.

<><><><><>

इराणवर पुन्हा हवाई हल्ले करण्याची शक्यता अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी फेटाळून लावली आहे. अमेरिकेनं पुन्हा हवाई हल्ले केले तर आपण त्याला प्रत्यूत्तर देऊ असा इशारा इराणनं दिला होता, त्यावर ट्रम्प यांनी हे स्पष्टीकरण दिलं. हे युद्ध थांबवण्यासाठी इराण वाटाघाटी करायला उत्सूक असल्याचंही त्यांनी सांगितलं. वाटाघाटींच्या स्थितीबद्दल केवळ मर्यादित व्यक्तिंनाच माहिती असल्याचंही ते म्हणाले. अमेरिकेनं इराणच्या लष्करी क्षमतेचं प्रचंड नुकसान केल्याचा दावाही त्यांनी केला.

दरम्यान, अमेरिका आणि इस्रायलनं इराण विरोधात सुरु केलेल्या युद्धादरम्यान एप्रिल महिन्याच्या सुरुवातीलाच युद्धविराम झाला आहे, त्यामुळे युद्ध सुरु ठेवण्यासाठी अमेरिकेच्या संसदेची अर्थात काँग्रेसची परवानगी घेण्याच्या मुदतीच्या दृष्टीने हे युद्ध आधीच संपलं असल्यानं, आता त्यासाठी काँग्रेसची औपचारिक मंजुरी घेण्याची गरज नसल्याचं ट्रम्प यांच्या प्रशासनानं म्हटलं आहे.

//<><><><><>//